# ‘स्पर्धा परीक्षेत मराठीचे महत्त्व’ या विषयावर व्याख्यान संपन्न

**देगलूर / प्रतिनिधी**



स्पर्धा परिक्षेत मराठीला अनन्यसाधारण महत्व असून लेखक, कवी ,त्यांचे साहित्य ,त्यांचे टोपण नाव,आणि व्याकरणाचा अभ्यास करावा लागतो असे डॉ. चंद्रशेखर बाकेवाड यांनी सांगितले.

ते अ. व्या. शिक्षण संस्थेचे देगलूर महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र व्याख्यानमालेत ₹स्पर्धापरीक्षेत मराठीचे महत्व₹ या विषयावर दि.१६ रोजी बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा.उत्तमकुमार कांबळे होते. महाविद्यालयात स्पर्धा मार्गदर्शन केंद्रामार्फत डॉ. चंद्रशेखर बाकेवाड यांनी. ₹मराठीचे स्पर्धा परिक्षेतील महत्व₹ विषयावर सविस्तर असे मार्गदर्शन केले.

व्याकरणातील नाम ,सर्वनाम , विभक्ती,क्रियापदाची वाक्य सांगून विद्यार्थ्यांना माहिती दिली.तसेच लीळाचरित्रकार महानुभवपंथाचे श्री. चक्रधर स्वामी यांच्या विषयी माहिती दिली उपप्राचार्य प्रा.उत्तमकुमार कांबळे यांनी मराठी विषयाचे महत्त्व विषद करून स्पर्धापरिक्षामार्गदर्शनकेंद्रा विषयी गौरवोदगारकाढले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.महेश कुलकर्णी यांनी तर आभार प्रा.डॉ. धनराज लझडे यांनी मानले.पर्यवेक्षक एस एन पाटील स्पर्धापरीक्षा समिती सदस्य प्राअनिता देबडवार, प्रा.नागरगोजे, प्रा.सिताराम हाके,शिवानंद सुर्यवंशी, प्रा.शिवचरण गुरूडे आदी सह विद्यार्थी ,विद्यार्थीनी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner